# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ 2626 /२०१८ दि. ३१/०८/२०१८

## परिपत्रक

विषय :- शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदींचे पालन करण्याबाबत...

संदर्भ :- मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रं. संकीर्ण -२०१८/प्र.क्र. ८०/२०१८/आस्था-२, दिनांक ३१ जुलै, २०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ३ मध्ये नमुद केल्यानुसार प्रत्येक कार्यालयाने / विभागाने त्यांच्याकडुन देण्यात येणाऱ्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपुर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरीता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमुद करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने, प्रत्येक कार्यालयाने / विभागाने नागरिकांची सनद प्रसिध्द करणेबाबतच्या सूचना शासन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी या विभागामार्फत देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द केलेल्या नागरिकांच्या सनदेत नमुद केलेल्या सेवा विहीत कालावधीत पुरविण्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केल्यानुसार आवश्यक कार्यवाही आपल्यास्तरावर घ्यावी.

**(डॉ. गो. दा. दुबे)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, प्रस्तृत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
सदरहु परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे व उक्तप्रमाणे अवलंब करण्यात यावा.

(योगेश्वर चरडे)
अधिक्षक(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत " शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदींचे पालन करण्याबाबत..." या विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे क्र.नासद-१५१८/प्र.क्र.५९/१८ अ,दिनांक ३० मे २०१८ चे शासन परिपत्रक.

---

पृष्ठांकन क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ८०/२०१८/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दूरध्वनी क्र.२२८५५७६६,
दिनांक : ३१ जुलै, २०१८

प्रति,

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण), उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

सदर शासन परिपत्रकातील सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत.

संशा चौबळ

( सं.श.चौबळ )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

C:\Users\shirish.padolya\Documents\क्र.CR_८०_२०१८.docx

E-3136466

**शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदींचे पालन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः नासद१५१८/ प्र. क्र. ५९ / १८ अ**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१८

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक : नासद २००९ / प्र.क. ८० / ०९ / १८अ, दिनांक ४ ऑगस्ट,२००९.

२) मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे रिट याचिका क्र. १३०३/२०१८ (रामचंद्र भाडू टेकम विरूद्ध जिल्हाधिकारी, नागपूर व इतर) वरील दि. ६ एप्रिल, २०१८ चे आदेश.

परिपत्रक :

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक कार्यालयाने /विभागाने त्यांच्याकडून देण्यात येणा-या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपूर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरीता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमूद करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने, प्रत्येक कार्यालयाने /विभागाने नागरिकांची सनद प्रसिद्ध करणेबाबतच्या सूचना शासन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी या विभागामार्फत देण्यात आल्या आहेत.

२. तथापि, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार प्रसिद्ध केलेल्या नागरिकांच्या सनदेत नमूद केलेल्या सेवा विहित कालावधीत पुरविण्याची अंमलबजावणी होणेबाबत खबरदारी घेतली जात नाही. या अनुषंगाने एका प्रकरणात जिल्हाधिकारी, नागपूर यांनी आदिवासी भूधारकाच्या जमीन हस्तांतरणाबाबतचे आदेश १२ वर्षांच्या विलंबाने निर्गमित केल्याचे संदर्भाधीन रिट याचिका क्र. १३०३/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपूर्ण अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही न झाल्याने नागरिकांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सदर याचिकेतून प्रकर्षाने निदर्शनास आले आहे.

३. सबब, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग / कार्यालये यांना पुन्हा सूचित करण्यात येते की, प्रत्येक कार्यालयाने /विभागाने त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी नागरिकांकडून प्राप्त परिपूर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरीता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमूद करणे अनिवार्य आहे. सदर नमूद केलेल्या कालावधीत संबंधित अर्जावर कार्यवाही करण्याची दक्षता कार्यालय प्रमुख/ विभागप्रमुख यांनी घ्यावी. या विभागाच्या उक्त संदर्भ क्र.१ येथील परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार संबंधित कार्यालयातून ज्या सेवा नागरिकांना पुरविल्या जातात, त्या सेवांबाबत खालील माहिती संबंधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याबाबत या परिपत्रकाद्वारे पुन:श्च सूचना देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांद्वारे उक्त सूचनांचे पालन करण्यात येत असल्याबाबत त्यांच्या स्तरावर खातरजमा करून दरवर्षी दि. १ मे रोजी याचा आढावा घ्यावा. तसेच या आढाव्यामध्ये जे अधिकारी/ कर्मचारी वरीलप्रमाणे विहित कालावधीमध्ये सेवा न पुरविता, सेवा देण्यास विलंब करीत असतील त्यांच्याविरूद्ध उक्त परिपत्रक क्र.१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० अन्वये अशा अधिकारी/ कर्मचा-यांविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई तातडीने करण्याचे निर्देश द्यावेत. उक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे दि. १ मे रोजी घेण्यात यावयाच्या आढाव्यामध्ये अशा प्रकारे विलंबास जबाबदार असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्यविरूद्ध केलेल्या कारवाईच्या प्रकरणांचा आढावा सुद्धा घेण्यात यावा.

ला



५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१८०५३०११२९१९०९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Kumar Jain

Digitally signed by Dinesh Kumar Jain
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Chief Secretary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ea3b8615acaf5a916338801298bc1b7123bd0cac17fa f57848ccd7382e28252c, cn=Dinesh Kumar Jain
Date: 2018.06.02 15:28:29 +05'30'

( दिनेश कुमार जैन )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती ( कार्यासन १८ ).

-----------